# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद (रजि.), कोल्हापूर

(संस्था नोंदणी क्र. : महाराष्ट्र / १०५७६-१९९५ / एफ - १०४६७-१९९५ कोल्हापूर)
द्वारा - इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
ई-मेल : shivajiuhc@gmail.com

जा. क्र. : SUHCK/2015-16 दिनांक : 05/01/2016

प्रति,
मा. प्राचार्य,
आर. आर. पाटील महाविद्यालय,
सावळज

विषय : शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे आगामी २१ वे अधिवेशन आयोजित करण्याबाबत...

महोदय,

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे २१ वे अधिवेशन आपण आपल्या महाविद्यालयामध्ये घेण्याचे निश्चित केले. याबद्दल आपले मन:पूर्वक आभार! आपणांस कळविण्यात आनंद होतो की, शिवाजी विद्यापीठाच्या आगामी २१ व्या अधिवेशनाचे यजमानपद आपल्या महाविद्यालयास देण्यास कार्यकारिणीने मान्यता दिली आहे.

अधिवेशनाच्या आयोजनासंदर्भात आपली चर्चा झाली होती. त्यातील काही महत्त्वाच्या बाबी आपल्या माहितीसाठी कळवित आहोत, कृपया त्यांची नोंद घ्यावी.

१. अधिवेशनाचे अध्यक्ष व तज्ज्ञ व्याख्याते यांची निवड शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेकडून केली जाते तथापि अधिवेशनाचे उद्घाटन आणि समारोप समारंभाचे प्रमुख अतिथी यजमान महाविद्यालयाने ठरवावेत.
२. अधिवेशनाचे अध्यक्ष व तज्ज्ञ व्याख्याते यांचा प्रवास भत्ता व मानधन यजमान महाविद्यालयाने देणेचा आहे. शिवाजी विद्यापीठ आपल्या व्याख्यानमालेतील पुष्प गुंफणाऱ्या वक्त्याला जेवढे मानधन (रू. २५००/-) देते. तेवढे मानधन व प्रवासभत्ता आपण अधिवेशनाचे अध्यक्ष व तज्ज्ञ व्याख्याते यांना देतो याची कृपया नोंद घ्यावी.
३. परिषदेच्या आजिव सभासदासाठी प्रतिनिधी शुल्क प्रत्येकी रू. ८००/- असून विद्यार्थ्यांसाठी रू. २००/- राहील. प्रतिनिधी शुल्कापैकी प्रत्येकी रूपये ५००/- यजमान महाविद्यालयाकडे व रू. ३००/- परिषदेकडे जमा होतील.
४. आजिव सभासद नसलेले प्राध्यापक/विद्यार्थी यांना प्रतिनिधी शुल्काव्यतिरिक्त हंगामी सभासद शुल्क प्रत्येकी रू. २००/- इतके भरावे लागेल व ते परिषदेकडे जमा होईल.
५. अधिवेशनासाठी येणारे बहुतेक प्रतिनिधी आदल्या दिवशी मुक्कामासाठी अधिवेशन स्थळी येतील. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी संध्याकाळपासून ते अधिवेशन संपेपर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या भोजन, न्याहरी, चहा, निवास इत्यादी व्यवस्था यजमान महाविद्यालयाने करावयाची आहे.
६. अधिवेशन स्थळाची पहाणी परिषदेचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. ~~व्ही. एन. नलावडे~~ व कार्यकारिणी सदस्य आपल्या महाविद्यालयास भेट देवून करतील. तरीही काही शंका असल्यास आपण परिषदेचे अध्यक्ष अथवा सचिव यांच्याशी संपर्क साधावा.

आपल्या कुशल नेतृत्वाखाली इतिहास विभागाचे प्राध्यापक व त्यांचे अन्य सहकारी यांच्या एकजुटीने आगामी अधिवेशन आपल्या महाविद्यालयात यशस्वीरित्या पार पडेल असा आम्हास विश्वास वाटतो.

आपले स्नेहांकित

(प्रा. डॉ. अवनिश पाटील)
कार्यवाह




**Vice Chancellor Prof. Dr. DevanandShindeShivaji Uni. Kolhapur Lighting Lamp in the Inaugural Function of 21st Annual Shivaji Uni. Kolhapur History Conference , Shrimati. Sumntai R.R. AabaPatil, MLATasgaon- Kavthemahankal Assembly & Others Dated- 12 Feb. 2016**




**Vice Chancellor Prof. Dr. DevanandShinde Delivering Speech in the 21st Annual ShivajiUni.,Kolhapur History ConferenceDated- 12 Feb. 2016**


श्री रावसाहेब रामराव पाटील
महाविद्यालय,सावळज
शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
२१ वे वार्षिक अधिवेशन
दि.१३ व १४ फेब्रुवारी २०१६


श्री रावसाहेब रामराव पाटील
महाविद्यालय,सावळज
शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
२१ वे वार्षिक अधिवेशन
दि.१३ व १४ फेब्रुवारी २०१६